जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 OCT 2026 लोकमत

दोन लाख दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ

शिवाजी विद्यापीठाने केले स्पष्ट : आधी भरलेले शुल्कही मिळणार परत

लोकमत न्यूज नेटवर्क


कोल्हापूर : आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. याबाबत विद्यापीठाने मंगळवारी परिपत्रक जारी केले असून, कार्यक्षेत्रातील सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

सन २०२६ च्या खरीप हंगामातील 'ट्रिगर वन'च्या पहिल्या टप्प्यात लागू झालेल्या तालुक्यांतील विद्यार्थ्यांना ही सवलत मिळणार आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा आणि चंदगड; सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, मिरज, आटपाडी आणि जत; तसेच सातारा जिल्ह्यातील सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा आणि महाबळेश्वर या १६ तालुक्यांचा समावेश आहे.

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, समाजकार्य आणि शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमांच्या सर्व संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांसह अधिविभागप्रमुख, संचालक आणि समन्वयकांना याबाबत विद्यापीठाने सूचना दिल्या आहेत.

या सवलतीसाठी विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे. पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यासाठी विद्यापीठाने १२ आणि १३ ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली आहे. परीक्षा व मूल्यमापन मंडळाने यासंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

भरलेले शुल्कही मिळणार परत



दरम्यान, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी यापूर्वीच परीक्षा शुल्क भरले असल्यास, त्यांना ही रक्कम परत मिळणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करून पात्र रक्कम एकत्रित स्वरूपात परत करण्यात येणार आहे. यासाठी संबंधित महाविद्यालयांनी आवश्यक विवरणपत्रे परीक्षा विभागाकडे सादर करण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे. तसेच, पात्र विद्यार्थ्यांनी अद्याप परीक्षा शुल्क भरले नसल्यास त्यांच्याकडून शुल्क आकारू नये, असे स्पष्ट निर्देशही विद्यापीठाने दिले आहेत.

07 OCT 2026
तरूण भारत

विद्यापीठातर्फे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील १६ तालुक्यांमधील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्कमाफी करण्यात येणार आहे. सदर तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी यापासून वंचित राहू नये, अशा सुचना विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये व विद्यापीठाच्या अधिविभागांना देण्यात आल्या आहेत.

याबाबतचे परिपत्रक शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मंगळवारी प्रसिद्धीस दिले आहे. पत्रकात म्हटले आहे की, शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्णयानुसार तसेच उच्च शिक्षण संचालनालय आणि विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर यांच्या निर्देशानुसार ही सवलत लागू करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दुष्काळसदृश तालुक्यांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील सहा, सांगली जिल्ह्यातील चार आणि सातारा जिल्ह्यातील सहा तालुक्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी प्रस्ताव विवरणपत्र 'अ' व आवश्यक प्रमाणपत्रांसह १२ व १३ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक असल्याचे आवाहन केले आहे.

पान ९ पाहा



- विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त १६ तालुक्यातील विद्यार्थ्यांना मिळणार लाभ
- आधी फी भरलेल्यांना प्रतिपूर्ती तर नव्याने अर्ज भरणाऱ्यांकडून शुल्क न घेण्याचे निर्देश

असे आहेत निकष

- कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा : ८ लाख रुपये
- प्रस्ताव सादरीकरण : १२ व १३ ऑक्टोबर २०२६

विद्यापीठातर्फे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ

पान १ वरून

दुष्काळामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आर्थिक भार कमी करण्याच्या उद्देशाने शासनाने परीक्षा शुल्कमाफीची सवलत दिली आहे. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या निर्णयाचा आधार मिळणार आहे. यामध्ये आधी फी भरलेल्या विद्यार्थ्यांची फी परत दिली जाणार आहे. तर नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क भरून घेतले जाणार नाही.

शुल्क मिळणार परत

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी दुष्काळसदृश तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क यापूर्वीच भरले असल्यास, त्यांना परीक्षा शुल्क परत मिळणार आहे.

ज्यांनी शुल्क भरलेले नाही, त्यांच्याकडून शुल्क घेऊ नये

ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क अद्याप विद्यापीठाकडे भरलेले नाही, अशा विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

प. महाराष्ट्रातील या तालुक्यांना लाभ

- कोल्हापूर जिल्हा : पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा आणि चंदगड असे एकूण सहा तालुक्यांचा समावेश
- सांगली जिल्हा : कवठेमहांकाळ, मिरज, आटपाडी व जत असे एकूण चार तालुक्यांचा समावेश
- सातारा जिल्हा : सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा आणि महाबळेश्वर या सहा तालुक्यांचा समावेश आहे.

07 OCT 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना फी माफी

शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक जाहीर; दोन लाख विद्यार्थ्यांना होणार लाभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

राज्यासह पश्चिम महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त भागातील शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची घोषणा शासनाने केली आहे. म्हणूनच मंगळवारी शिवाजी विद्यापीठाने फी माफीचे परिपत्रक जाहीर केले आहे. कार्यक्षेत्रातील सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांना याचा फायदा मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, समाजकार्य आणि शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम असणाऱ्या सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना तसेच अधिविभागप्रमुख, संचालक आणि समन्वयक यांना यासंदर्भात सूचित केले आहे. सन २०२६



च्या खरीप हंगामातील ट्रिगर वन प्रथम काळात लागू झालेल्या तालुक्यांमध्ये कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना फी माफीची ही सवलत मिळणार आहे. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा आणि चंदगड या सहा तालुक्यांचा, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, मिरज, आटपाडी आणि जत या चार तालुक्यांचा तर सातारा जिल्ह्यातील सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा आणि महाबळेश्वर या सहा अशा एकूण १६ तालुक्यांतील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. मात्र, यासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांच्या आत असावे, असा नियम केला आहे. यासंदर्भात दि. १२ आणि १३ ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव सादर करण्याची मुदत विद्यापीठाने दिली आहे. हे पत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रसिद्ध केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2026 जनप्रवास

सहकाराच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा

- सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांचे आवाहन



शिवाजी विद्यापीठात संजय पाचपोर यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. सोबत डॉ. सुभाष कोंबडे, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. केदार मारुलकर.

जनप्रवास : कोल्हापूर

सहकाराचा अभ्यास करून प्रत्येकाने किमान एका सहकारी संस्थेचा सभासद व्हावे. बदलत्या काळात सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी केले.

गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि एमबीए विभागातर्फे 'सहकाराद्वारे सर्वसमावेशक शाश्वत विकास' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते काल (दि. ५) बोलत होते. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिसभा सदस्य संजय परमणे तसेच विविध सहकारी संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पाचपोर म्हणाले, सहकारामध्ये प्रचंड ताकद असून त्यातून गावाचा विकास, रोजगारनिर्मिती आणि शिक्षण क्षेत्रात प्रगती साधता येते. सहकाराच्या माध्यमातून आत्मनिर्भरता निर्माण होऊ शकते. सहकाराचे स्वरूप आणि कार्यपद्धती समजून घेतल्यास माणसाचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधता येतो. सहकारी संस्था चालविणाऱ्या संचालक मंडळाला कोणतेही मानधन मिळत नाही. त्याग आणि सेवाभावातून सहकाराची चळवळ पुढे जाते. गोकुळ, अमूल आणि इफ्को यांसारख्या संस्था शाश्वत विकासाची उत्तम उदाहरणे असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सहकार क्षेत्र हे सर्वसमावेशक विकासाचे एक सिद्ध झालेले मॉडेल असलेचे नमूद केले. त्यांनी यशस्वी सहकारी व्यवस्था ही संस्कार व मानवी मूल्यावर आधारित आहे, या लक्ष्मणराव इनामदार यांच्या विचाराची आठवण करून दिली. ग्रामीण भागाचा कायापालट करण्याची शक्ती सहकारामध्ये असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सहकारामध्ये नवीन संस्था उद्यास येत असून त्याद्वारे कार्यक्षमता वाढत असलेचे मतही व्यक्त केले. केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शामल पवार यांनी आभार मानले.

07 OCT 2026

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संजय पाचपोर यांचे स्वागत करताना कुलगुरू डॉ. राजनीश कामत. सोबत प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. केदार मारुलकर.

सहकार क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक : संजय पाचपोर

प्रतिनिधी, कोल्हापूर

बदलत्या काळात सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक आहे, असे प्रतिपादन सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी केले. गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि एमबीए विभागातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'सहकाराद्वारे सर्वसमावेशक शाश्वत विकास" या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिसभा सदस्य संजय परमणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाचपोर म्हणाले, सहकारातून गावांचा विकास, प्रगती साधता येते. या तून आत्मनिर्भरता निर्माण होऊ शकते. सहकाराचे स्वरूप व कार्यपद्धती समजून घेतल्यास शाश्वत व सर्वांगीण विकास होतो. गोकुळ, अमूल व इफ्को यासारख्या संस्था शाश्वत विकासाची उत्तम उदाहरणे असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. कामत यांनी सहकार क्षेत्र हे सर्वसमावेशक विकासाचे मॉडेल आहे. ग्रामीण भागाचा कायापालट करण्याची शक्ती सहकारामध्ये असल्याचे सांगितले. केंद्राचे समन्वयक डॉ. कोंबडे यांनी स्वागत केले. शामल पवार यांनी आभार मानले.

07 OCT 2026

जनपवास

वंचितांच्या सिनेमावर सखोल अभ्यास आवश्यक : राजेभोसले

शिवाजी विद्यापीठात 'वंचित घटकांचे सिनेमातील स्थान' विषयावरील कार्यशाळा

कोल्हापूर : प्रतिनिधी

वंचितांच्या सिनेमावर सखोल अभ्यास होणे आवश्यक असल्याचे मत अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष. मेघराज राजे भोसले यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग विभाग आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वंचित घटकांचे सिनेमातील स्थान या विषयावर ६ आणि ७ या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन मास कम्युनिकेशन विभागात करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.



वंचित घटकाचे सिनेमातील स्थान या विषयावर मार्गदर्शन करताना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले.

राजेभोसले म्हणाले, मराठी चित्रपटसृष्टीची सुरुवात कोल्हापूरसारख्या पुरोगामी शहरातून झाली. कोल्हापूर ही चित्रपटाची पंढरी आणि केंद्रबिंदू असलेले शहर आहे. या शहरातून वंचित घटकाचे सिनेमातील स्थान हा विषय घेऊन कार्यशाळा होत असल्याचे समाधान आहे. या घटकांचे सिनेमातील स्थान हा अत्यंत महत्त्वपूर्ण विषय असून त्याचा जाणीवपूर्वक अभ्यास होणे गरजेचे आहे. वंचित घटकांकडे दुर्लक्ष न करता त्यांना चित्रपटांमध्ये योग्य स्थान दिले पाहिजे.

सर्व घटकांना सिनेमात योग्य प्रतिनिधित्व मिळाले, तरच समाजाभिमुख चित्रपटांची निर्मिती होईल. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक ज्ञान आत्मसात करून ते स्वतःमध्ये रुजवले पाहिजे. त्याचा भविष्यात निश्चितच फायदा होईल, असेही त्यांनी सांगितले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, मास कम्युनिकेशन विभाग सातत्याने नवनवीन विषय घेऊन विद्यार्थी आणि समाजासमोर येत असतो. विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी धडपडणाऱ्या या विभागाकडून मिळणाऱ्या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांनी स्वतःचे नाव मोठे केले, तर त्यातून विद्यापीठासह कोल्हापूरचेही नाव उंचावेल, असेही डॉ. शिंदे यांनी सांगितले.

नाईट कॉलेज मराठी विभागाचे प्रमुख प्रा. अरुण शिंदे, ज्येष्ठ संपादक डॉ. विजय चोरमारे, अश्विनी धायगुडे-कोळेकर, डॉ. अनमोल कोठडिया, डॉ. रत्नाकर पंडित, रवी सूर्यवंशी, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, अनुप जत्राटकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रीती भिसे व अभिजीत घागरे यांनी करून दिली, सूत्रसंचालन सायली गणेशकर हिने तर आभार साक्षी वाघमोडे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 OCT 2026 जनप्रवास

व्यवस्थापन कौशल्यासाठी योग्य प्रशिक्षण आवश्यक

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर



महिलांमध्ये कुटुंबाचे अर्थकारण सांभाळण्याची, उपलब्ध संसाधनांचे योग्य नियोजन करण्याची आणि मर्यादित साधनातून घर चालविण्याची नैसर्गिक क्षमता असते. हीच क्षमता योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून उद्योजकीय क्षेत्रात प्रभावीपणे वापरता येऊ शकते. महिलांमध्ये उपजतच असणारे सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन कौशल्य विकसित होण्यासाठी योग्य प्रशिक्षणाची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र व इंडोकाऊंट फाऊंडेशन अंतर्गत महालक्ष्मी कौशल्य विकास केंद्र, गोकुळ शिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "महिलांसाठी मार्केटिंग आणि विक्री कौशल्य" कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते.

डॉ. जत्राटकर म्हणाले, विक्री आणि मार्केटिंगचे मूळ संवादात आहे. ग्राहकांशी योग्य संवाद साधता आला, तर उत्पादनाकडे पाहण्याची दृष्टी बदलते आणि विश्वासाचे नाते तयार होते. महिलांनी केवळ उत्पादन निर्मितीपुरते मर्यादित न राहता बाजारपेठ, ग्राहक संपर्क, ब्रँडिंग आणि उत्पादन विविधीकरण यांचा विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले. बचत गटांनी आपल्या परिसरातील ग्राहकांशी थेट संपर्क वाढवावा. सण-उत्सव, स्थानिक विक्री केंद्रे, लहान दुकाने आणि घरगुती पुरवठा व्यवस्था यांचा योग्य उपयोग करून महिलांना आपले उत्पादन अधिक प्रभावीपणे पोहोचविता येते. छोट्या गटांनाही योग्य नियोजन, दर्जेदार उत्पादन आणि ग्राहकांशी सुसंवाद यामुळे मोठे स्थान निश्चितपणे निर्माण करता येऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. इंडोकाऊंटचे सल्लागार प्रफुल्ल रंगारी म्हणाले, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने इंडोकाऊंट समूह सातत्याने प्रयत्नशील आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्यामुळे या उपक्रमाला मोठे पाठबळ लाभले आहे. हे सहकार्य अधिक वृद्धिंगत करून अधिकाधिक महिलांचे यामध्ये समावेशन व्हावे, या दृष्टीने पुढील काळात प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

डॉ. रामचंद्र पवार म्हणाले, महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून विविध उत्पादने तयार करण्याबरोबरच त्यांचे प्रभावी ब्रँडिंग, मार्केटिंग आणि विक्री व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. प्रास्ताविक प्रकल्प समन्वयक प्रमोद कांबळे यांनी केले. कौशल्य विकास अधिकारी ईश्वर पुजारी यांनी आभार मानले. यावेळी मंचावर संदीप माने, रविंद्र खैरे, स्मिता जाधव, दिशा अग्रवाल आदी उपस्थित होते.

07 OCT 2026

तरुण भारत



कोल्हापूर : कौशल्य विकास कार्यशाळेत बोलताना डॉ. आलोक जत्राटकर सोबत रविंद्र खैरे, डॉ. रामचंद्र पवार, प्रफुल्ल रंगारी व संदीप माने.

प्रशिक्षणामुळे महिलांच्या विकास कौशल्याला चालना

प्रतिनिधी, कोल्हापूर

डॉ. अलोक जत्राटकर यांचे प्रतिपादन

महिलांमधील सामाजिक व आर्थिक व्यवस्थापन कौशल्यांच्या विकासासाठी योग्य प्रशिक्षणाची आवश्यकता असते. यामुळे महिलांच्या कौशल्य विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र व इंडोकाऊंट फाऊंडेशन अंतर्गत महालक्ष्मी कौशल्य विकास केंद्र, गोकुळ शिरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महिलांसाठी मार्केटिंग आणि विक्री कौशल्य' कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार होते. इंडोकाऊंटचे सल्लागार प्रफुल्ल रंगारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रफुल्ल रंगारी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्यामुळे या उपक्रमाला मोठे पाठबळ लाभले आहे. यातून अधिकाधिक महिलांचे समावेशन व्हावे, या दृष्टीने प्रयत्न करणार आहे. डॉ. रामचंद्र पवार म्हणाले, महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून विविध उत्पादने तयार करण्याबरोबरच त्यांचे प्रभावी ब्रँडिंग, मार्केटिंग आणि विक्री व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे.

प्रकल्प समन्वयक प्रमोद कांबळे यांनी स्वागत केले. कौशल्य विकास अधिकारी ईश्वर पुजारी यांनी आभार मानले. यावेळी ग्रामोद्योग अधिकारी संदीप माने, व्यवसाय मार्गदर्शक रविंद्र खैरे, स्मिता जाधव, दिशा अग्रवाल उपस्थित होते.

07 OCT 2026

दिनांक समाचार

शिवाजी विद्यापीठात अभिजात मराठीचे गौरवगान; प्रेक्षकांचा जल्लोषी प्रतिसाद

कोल्हापूर/प्रतिनिधी :

अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेल्या मायमराठीचे जतन, संवर्धन आणि प्रचार, प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रतिबद्ध आहे. त्यासाठी राज्यभरात अनेक वैविध्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनीही मराठीच्या संवर्धनासाठी आपला वाटा उचलण्यास सिद्ध व्हावे, असे आवाहन राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात आज सायंकाळी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताह -२०२६ या उपक्रमांतर्गत आयोजित 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांगितिक - सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

अभिजात मराठी भाषेचे गौरवगान करणाऱ्या या कार्यक्रमास प्रेक्षक, श्रोत्यांचा प्रचंड जल्लोषी प्रतिसाद लाभला.

उद्घाटन प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, मराठी भाषेच्या अनेक बोलींमध्ये कोल्हापूरची मराठी ही केवळ देशातच नव्हे, तर जगात वैशिष्ट्यपूर्ण आणि लोकप्रिय आहे. या भाषेचा आपण नेहमी अभिमान मिरवला पाहिजे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल राज्यभरातील विद्यापीठांत सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठालाही या गोष्टीचा मोठा अभिमान असल्याने हा कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. येथून पुढेही असे मराठी भाषेच्या गौरवपर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

सुरवातीला मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी मंचावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी, विविध अधिकार मंडळांचे सदस्य, अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

07 OCT 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २४ ऑक्टोबरपासून

८५० हून अधिक अभ्यासक्रम; २ लाख ५० हजार विद्यार्थी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना २४ ऑक्टोबरपासून सुरुवात होणार आहे. कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील सुमारे अडीच लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. पहिल्या टप्प्यात बी. व्होक. अभ्यासक्रमांच्या परीक्षा होतील.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने हिवाळी सत्रातील परीक्षांसंदर्भात अधिविभाग व महाविद्यालयांना तयारीच्या सूचना दिल्या आहेत. हिवाळी सत्रात पदविका, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील विविध अभ्यासक्रमांच्या ८५० पेक्षा जास्त परीक्षा होणार आहेत. यात २९१ हून अधिक महाविद्यालये आहेत. बी.व्होक.च्या परीक्षा २४ ऑक्टोबरपासून सुरू होतील. त्यानंतर पदवी परीक्षांना (पारंपरिक) २६ ऑक्टोबर, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षांना २९ नोव्हेंबरपासून प्रारंभ होणार आहे. १९ ऑक्टोबरपर्यंत महाविद्यालये व अधिविभागांना वेळापत्रक आणि हॉल तिकीट उपलब्ध करून दिले जाणार आहे.

तीन लाख उत्तरपत्रिकांची ऑनस्क्रीन तपासणी होणार

पदवी व पदव्युत्तर स्तरावरील २३ अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी संगणक प्रणालीतून ऑनस्क्रीन पद्धतीने करण्यात येणार आहे. यामध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांचाही समावेश असून ३ लाखांपेक्षा जास्त उत्तरपत्रिकांची तपासणी केली जाणार आहे. विद्यापीठ अधिविभागांसह संलग्नित महाविद्यालयांमध्ये परीक्षा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

> विद्यापीठाकडून महाविद्यालय व अधिविभागातील हिवाळी सत्र परीक्षांचे नियोजन सुरू आहे. त्यासंदर्भात समित्यांचे कामकाज सुरू झाले आहे. अभ्यासक्रमनिहाय परीक्षा प्रारंभाच्या तारखांचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर जाईल.
> **– डॉ. अजितसिंह जाधव**, संचालक, परीक्षा व मूल्यामापन मंडळ

जनसंपर्क कक्ष
07 OCT 2026
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'डॉ. जयसिंगराव पवार यांचे इतिहास लेखनात मोठे योगदान'

प्रतिनिधी, कोल्हापूर



कोल्हापूर : एक दिवशीय राष्ट्रीय परिसंवादात बोलताना डॉ. अवनीश पाटील. मंचावर उपस्थित प्राचार्य डॉ. आ. के. शानेदिवाण, भारतभूषण माळी

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनातील डॉ. जयसिंगराव पवार यांचे योगदान मोठे आहे असे प्रतिपादन डॉ. अवनीश पाटील यांनी केले. शहाजी महाविद्यालयात इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार इतिहास लेखन, संशोधन आणि योगदान या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय परिसंवादात ते बोलत होते.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात शनिवारी इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार इतिहास लेखन, संशोधन आणि योगदान या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय परिसंवाद झाला. शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी पहिल्या सत्रात बोलताना डॉ.अवनीश पाटील यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहास लेखनातील डॉ. जयसिंगराव पवार यांचे योगदान या विषयावर सविस्तर विवेचन केले. शिवाजी विद्यापीठाचे माजी बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांची भाषणे झाली.

परिसंवादाच्या दुसऱ्या सत्रात डॉ. सुरेश शिखरे यांनी जयसिंगराव पवार यांची इतिहास लेखन पद्धतीवर सविस्तर माहिती दिली. इतिहास डॉ. मंजुश्री पवार यांनी इतिहास संशोधक 'माझे बाबा' यावर मनोगत व्यक्त केले. डॉ. अरुंधती जयसिंगराव पवार यांनी महाविद्यालयाचे आभार मानले. अध्यक्षस्थानी जेष्ठ इतिहास संशोधक, प्राचार्य डॉ.इस्माईल पठाण होते. समारोप सत्र प्राचार्य डॉ. जे. के.पवार यांच्या उपस्थितीत व प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

उद्घाटन सत्राचे स्वागत डॉ. आर. डी.मांडणीकर यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर.के .शानेदिवाण यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.पी.के.पाटील यांनी केले. आभार डॉ.शिवाजी रायजादे यांनी मांनले. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार यांच्या यांच्यावरील शहाजी वार्ताच्या तिसाव्या अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

यावेळी श्रीमती वसुधा जयसिंगराव पवार; नगरसेवक इंद्रजीत बोंद्रे, प्राचार्य पाटील, प्रा. अरुण भोसले, डॉ. पवार,मंजुश्री पवार, डॉ डमकले, शिपुरकर यांची उपस्थिती होती.